# वळसे पाटील महाविद्यालयात बाबासाहेबांना अभिवादन



**| खोडद :** दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, निमगाव सावा (ता. जुन्नर) येथे राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास मंडळ व इतिहास विभाग यांच्या वतीने प्रज्ञासूर्य, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव येथील प्रा. अर्चना अवताडे यांनी प्रतिमा पूजन केले. तसेच प्रा. प्रल्हाद शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे नियोजन प्रा. नितीन मोजाड, प्रा. राहुल सरोदे व प्रा. नीलम गायकवाड यांनी केले. यावेळी प्राचार्य डॉ. छाया जाधव, प्रा. प्रकाश कांबळे, विद्यार्थी आदी उपस्थित होते. प्रस्ताविक प्रा. शिवाजी साळवे यांनी केले. प्रा. सुभाष घोडे यांनी आभार मानले.

पुण्य नगरी